# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.५१००/शि.वि./२०१५
दि.१९/११/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
सर्व प्राथ./उच्च प्राथ. माध्य. शाळा
म.नपा. नागपूर

**विषय :— 26 नोव्हेंबर 'संविधान दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत**

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, संविधान जागृतीचे अभियानास्तव शाळांमधून रोज संविधान प्रास्ताविकेचे वाचन सुरू झालेले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने 2008 पासून राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालय व कार्यालयात संविधान दिवस 26 नोव्हेंबरला साजरा करण्याचे आदेश दिलेले आहे. या सोबतच शालेय शिक्षण विभागाच्या दि. 04.02.2013 च्या शासन निर्णयान्वये संविधान जागृतीचे विविध कार्यक्रम वर्षभर शाळांमध्ये राबवून व रोज संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्याचे निर्देश शाळांना दिलेले आहे.

या अनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की दि. 26 नोव्हेंबर ते 26 जानेवारी या कालावधीत संविधान महोत्सव साजरा करून संविधानासंबंधी माहितीपर निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, वादविवाद स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा शाळांस्तरावर वर्गनिहाय आयोजित कराव्यात. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये संविधान जागृती होण्याचे कार्य होवू शकेल. या सोबतच दि. 26 नोव्हेंबर ला संविधान दिवस म्हणून साजरा करून या दिवशी प्रार्थनेच्या वेळी सामुदायिकपणे विद्यार्थी व शिक्षक याचेकडून संविधान प्रस्ताविकेचे वाचन करून घ्यावेत.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर